नमुना क्र. ३२

भाग 'अ'
(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)
[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(i)]

	ग ड चि रो ली ये थी ल स त्र न्या या ल या त **पिठासन अधिकारी : श्री उत्तम मु. मुधोळकर** **अतिरिक्त सत्र न्यायाधीश** **न्यायनिर्णयाचा दिनांक : २५/०४/२०२३** **विशेष बाल संरक्षण खटला क्र. ७०/२०२२**	
	अपराध क्र. : २४१/२०२२ पोलीस ठाणे : चामोर्शी, तहसील - चामोर्शी, जिल्हा गडचिरोली	
अभियोग पक्ष		**महाराष्ट्र शासन तर्फे** पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली
अभियोग पक्षातर्फे		विद्वान लोकअभियोक्ता श्री. अनिल प्रधान
आरोपी		**आ १ - कमल पंचाराम साधु** वय ३० वर्षे, धंदा - शेती,
		आ २ - पंचाराम हरिबर साधु वय ६३ वर्षे, धंदा - शेती,
		आ ३ - दिपुराणी उर्फ दिपु पंचाराम साधु वय ४७ वर्षे, धंदा - शेती, आ.क्र.१ ते ३ राहणार - गल्ली क्र.३, जयनगर, तालुका - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली.
		आ ४ - निशा राजबिहारी सरकार वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम,
		आ ५ - राजबिहारी रविन सरकार वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम, आ.क्र.४ व ५ राहणार - दुर्गापूर, पोस्ट - चित्तरंजनपूर, तालुका - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली.
आरोपींतर्फे		विद्वान विधिज्ञ श्री सतीष बारसिंगे

भाग 'ब'
[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)]

अपराधाची तारीख	२७/१०/२०२०
पहिली खबरची तारीख	०३/०८/२०२२
दोषारोपपत्राची तारीख	१४/१०/२०२२
दोषारोप निश्चितीची तारीख	१९/१२/२०२२
जबाब नोंदणी सुरु झाल्याची तारीख	१६/०१/२०२३
न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख	२५/०४/२०२३
न्यायनिर्णयाची तारीख	२५/०४/२०२३
शिक्षा आदेशाची तारीख, असल्यास	---

आरोपीचा तपशील

आरोपीचे स्थान	आरोपीचे नाव	अटकेची तारीख	जामीनावर सोडल्याची तारीख	दोषारोपातील गुन्हे	निर्दोष मुक्त अथवा शिक्षा	लादलेली शिक्षा	खटल्याची प्रक्रिया सुरु असताना आरोपी न्यायाधीनबंदी असल्याचा कालावधीचा फौ. प्र.सं.च्या कलम ४२८ प्रमाणे सुट मिळण्यासाठी
आ १	**कमल पंचाराम साधु**	२२/०८/२०२२	१५/१२/२०२२	भादंसं क.३७६(२)(ज),(न) आणि ३७६(३), बालैंगु संका कलम ४ व ६ तसेच बा.वि.प्रति. कायदा क. ९, १० व ११ अन्वये	निर्दोष मुक्त	...	...
आ २	**पंचाराम हरिबर साधु**	१५/०९/२०२२	१४/१०/२०२२	--''--	निर्दोष मुक्त	...	...
आ ३	**दिपुराणी उर्फ दिपु पंचाराम साधु**	१५/०९/२०२२	१४/१०/२०२२	--''--	निर्दोष मुक्त	...	...
आ ४	**निशा राजबिहारी सरकार**	१५/०९/२०२२	१४/१०/२०२२	--''--	निर्दोष मुक्त	...	...
आ ५	**राजबिहारी रविन सरकार**	१५/०९/२०२२	१४/१०/२०२२	--''--	निर्दोष मुक्त	...	...

भाग 'क'

[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]

सरकारपक्ष / बचाव / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. सरकारपक्ष :

स्थान	नाव	पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)
ससा१	पीडित बालिका	पीडिता व फिर्यादी
ससा२	वैद्य विस्मय संजीव देवतळे	वैद्यकीय साक्षीदार
ससा३	पल्लवी गोविंद वाघ	पोलीस साक्षीदार / तपासी अधिकारी

ब. बचाव साक्षीदार, असल्यास :

स्थान	नाव	पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)
	--निरंक--	

क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :

स्थान	नाव	पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)
	--निरंक--	

सरकारपक्ष / बचाव / न्यायालयीन निशाणींची यादी

अ. सरकारपक्ष :

अ.क्र.	निशाणी क्रमांक	विवरण
१.	निशाणी स-६२/ससा१	फिर्याद/जबाब
२.	निशाणी स-६३/ससा१	कलम १६४ फौ.प्र.सं. अंतर्गत पीडितेचा जबाब
३.	निशाणी स-६४/ससा१	शाळा सोडल्याचा दाखला

४.	निशाणी स-६७/ससा२	पत्र
५.	निशाणी स-६८ ते ७० /ससा२	तीन ओळख नमुने
६.	निशाणी स-७१/ससा२	पत्र
७.	निशाणी स-७२/ससा२	वैद्यकीय अहवाल
८.	निशाणी स-८२ ते ८४ /ससा३	पत्रे
९.	निशाणी स-८५/ससा३	संगणकीय छापील फिर्याद
१०.	निशाणी स-८६, ८८ ते ९३ /ससा३	पत्रे
११.	निशाणी स-९४	पोहोच पावती
१२.	निशाणी स-९५	पत्र

ब. बचावपक्ष :

अ.क्र.	निशाणी क्रमांक	विवरण
१.	नि.क्र.७४	घटनास्थळ पंचनामा (बचावपक्षाने मान्य केला.)
२.	नि.क्र.७५	गुन्ह्याचा तपशील नमुना (बचावपक्षाने मान्य केला.)
३.	नि.क्र.७६ ते ८०	अटकेचे नमुने (बचावपक्षाने मान्य केले.)
४.	नि.क्र.८७	पत्र (बचावपक्षाने मान्य केला.)

क. न्यायालयीन निशाणी :

अ.क्र.	निशाणी क्रमांक	विवरण
१.	नि.क्र.९७	जनुकीय अहवाल

ड. महत्त्वाचे वस्तु :

अ.क्र.	महत्त्वाच्या वस्तुंचे क्रमांक	विवरण
१.	मव-अ१ ते अ४	चार छायाचित्रे

MHGA010008582022	दाखल तारीख	:	१४/१०/२०२२
	नोंदणी तारीख	:	१४/१०/२०२२
	निकाल तारीख	:	२५/०४/२०२३
	कालावधी	:	०० व. ०६ म. ११ दि.
	निशाणी क्र. १०३		

ग ड चि रो ली ये थी ल स त्र न्या या ल या त

(पिठासन अधिकारी श्री उत्तम मु. मुधोळकर)
(अतिरिक्त सत्र न्यायाधीश)

विशेष बाल संरक्षण खटला क्र. ७०/२०२२

महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस ठाणे अधिकारी,
पोलीस ठाणे, चामोर्शी,
तहसील - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली ... **अभियोग पक्ष**

-विरुद्ध-

आ १. कमल पंचाराम साधु
वय ३० वर्षे, धंदा - शेती,

आ २. पंचाराम हरिबर साधु
वय ६३ वर्षे, धंदा - शेती,

आ ३. दिपुराणी उर्फ दिपु पंचाराम साधु
वय ४७ वर्षे, धंदा - शेती,
आ.क्र.१ ते ३ राहणार - गल्ली क्र.३, जयनगर,
तालुका - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली.

आ ४. निशा राजबिहारी सरकार
वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम,

आ ५. राजबिहारी रविन सरकार
वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम,
आ.क्र.४ व ५ राहणार - दुर्गापूर,
पोस्ट - चित्तरंजनपूर,
तालुका - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली. ... **आरोपी**

....

अभियोग पक्षातर्फे विद्वान लोकअभियोक्ता श्री.अनिल प्रधान
आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री सतीष बारसिंगे

....

भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३७६ (२)(ज),(न) आणि ३७६(३) आणि बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ कलम ४ आणि ६ तसेच बाल विवाह प्रतिबंधक कायदा कलम ९, १० व ११ अन्वये दोषारोप

....

<u>मौखिक न्यायनिर्णय</u>

(दिनांक २५/०४/२०२३)

१. वर नमूद आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० कलम ३७६ (२)(ज),(न) आणि ३७६(३) (ज्याचा संक्षेपाच्या कारणाकरीता यापुढे ''भादंसं'' असा उल्लेख केला आहे), बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ (ज्याचा संक्षेपाच्या कारणाकरीता यापुढे ''बालैंगुसंका'' असा उल्लेख केला आहे) कलम ४ आणि ६ तसेच बाल विवाह प्रतिबंधक कायदा (ज्याचा संक्षेपाच्या कारणाकरीता यापुढे ''बाविप्रका'' असा उल्लेख केला आहे) कलम ९, १० आणि ११ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपाखाली खटला भरण्यात आलेला आहे.

२. सदर खटल्यासंदर्भात दोषारोपपत्रात नमूद असलेले अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

दिनांक ३०.०८.२०२२ रोजी पीडित बालिका, जी १७ वर्षे ०३ महिने वयाची होती, बाळंतपणासाठी ग्रामिण रुग्णालय चामोर्शी येथे दाखल झाली असता संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांचे निदर्शनास असे आले की, पीडित बालिका अल्पवयीन असून ती गर्भवती आहे. सबब त्यांनी त्याबाबतचे सूचनापत्र चामोर्शी पोलीस ठाणे यांना दिले. सदर पोलीस ठाण्याच्या मसपोनि पल्लवी वाघ यांनी तात्काळ रुग्णालयाकडे धाव घेतली आणि पीडित बालिकेचा जबाब नोंदविला. सदर जबाबामध्ये पीडित बालिकेने प्रामुख्याने असे कथन केले की, दोन वर्षापूर्वी त्या दोघांच्या पालकांनी त्यांचा विवाह लावून दिला आणि ते दोघे पतीपत्नी म्हणून एकत्र रहिवास करु लागले. त्यांच्या तशा एकत्र रहिवासाच्या काळात त्यांच्यामध्ये वारंवार शारीरीक संबंध प्रस्थापित झाल्याने ती

गर्भवती झाली. यथावकाश तिला गरोदरपणाचे ९ महिने पूर्ण झाल्याने तिचा पती कमल आणि इतर कुटूंबियांनी तिला सदर रुग्णालयात दाखल केले. सदरचा जबाब हा फिर्याद म्हणून नोंदवून घेण्यात आला आणि त्यानुसार वरील भादंसं, बालैंगुसंका आणि बाविप्रका कलमान्वये आरोपींविरुद्ध गु.नों.क्र.२४१/२०२२ दाखल झाला. सदर गुन्ह्याचे तपासकाम अन्वेषण अधिकारी पल्लवी वाघ यांना सोपविण्यात आले. तपासकामी त्यांनी पीडित बालिकेकडे घटनेबाबत चौकशी करुन तिचा जबाब नोंदविला. तसेच घटनास्थळी धाव घेवून पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, छायाचित्रे घेतली. त्याचप्रमाणे त्यांनी आरोपींना अटक केली आणि आवश्यक त्या सर्व साक्षीदारांची टिपणे नोंदविली. पीडितेची व आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन अहवाल प्राप्त करुन घेतला. वैद्यकीय अधिकारी यांनी प्राप्त केलेले जैविक नमूने न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूर येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले. पीडित बालिकेच्या जन्मतारखेबाबतचा लेखी पुरावा तसेच इतर कागदोपत्री पुरावा प्राप्त करण्यात आला. दोषारोपपत्रात नमूद केलेप्रमाणे आरोपींनी गुन्हा केल्याचे त्यांना तपासकामी निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुद्ध खटला चालविण्यासाठी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

३. यथावकाश सर्व आरोपी सत्र न्यायालयात हजर झाले. आरोपींविरुद्ध लावण्यात आलेले दोषारोप विचारात घेवून निशाणी क्र.५५ येथे भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३७६ (२)(ज),(न) आणि ३७६(३), बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२, कलम ४ आणि ६ तसेच बाल विवाह प्रतिबंधक कायदा कलम ९, १० आणि ११ अन्वये या न्यायालयाने दोषारोप निश्चित केले. त्यांना गुन्हा कबूल नसल्याचे आरोपींनी कथन करुन त्यांचेविरुद्ध कामकाज पुढे सुरु ठेवण्याची त्यांनी विनंती केली.

४. दोषारोपातील कथनासमर्थनार्थ अभियोग पक्षाने तोंडी तसेच लेखी पुरावा न्यायपटलावर सादर केला.

५. आरोपींचा गुन्हयामध्ये दिसणारा सहभाग विचारात घेवून फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपींचा जबाब नोंदविण्यात आला. त्यांनी

कोणताही गुन्हा केलेला नसून ते निष्पाप व निर्दोष असल्याचे त्यांनी कथन केले.

६. अभियोग पक्षातर्फे विद्वान लोकअभियोक्ता श्री. अनिल प्रधान आणि आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री सतीष बारसिंगे यांचा दिर्घ युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे विद्वान लोकअभियोक्ता श्री. अनिल प्रधान यांनी असा जोरदार युक्तीवाद केला की, आरोपींविरुद्धचा दोषारोप अभियोग पक्षाने योग्य त्या पुराव्याआधारे शाबित केलेला आहे. त्यामुळे आरोपींना कायद्याप्रमाणे कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. सबब, आरोपींना न्यायोचित अशी कठोर शिक्षा देण्याची त्यांनी विनंती केली. याउलट, आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री सतीष बारसिंगे यांनी असा जोरदार युक्तीवाद केला की, न्यायपटलावर दाखल केलेला पुरावा हा आरोपींविरुद्धचा दोषारोप शाबित करणेस सक्षम नाही आणि त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी आरोपींची निर्दोष मुक्तता होणे आवश्यक आहे. सबब, आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याची त्यांनी न्यायालयाला विनंती केली.

७. आरोपींविरुद्ध असलेला दोषारोप आणि उभयपक्षकारांचा युक्तीवाद विचारात घेता पुढीलप्रमाणे वादबिंदू निश्चित करण्यात आले असून त्यांचे सकारण निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

	वादबिंदू	**निष्कर्ष**
१.	दिनांक २७/१०/२०२० ते ०२/०८/२०२२ या कालावधीत क्रिष्णनगर, तहसील - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली येथे आरोपी क्र.१ कमल याने पीडित बालिकेवर वारंवार बलात्कार केला, असे अभियोग पक्ष शाबित करतो काय ?	नाही
२.	वर नमूद कालावधीत आणि ठिकाणी आरोपी क्र.१ कमल याने १६ वर्षाखालील पीडित बालिकेवर वारंवार लैंगिक अत्याचार केले, असे अभियोग पक्ष शाबित करतो काय ?	नाही
३.	वर नमूद कालावधीत आणि ठिकाणी आरोपी क्र.१ कमल याने पीडित बालिकेवर अंतर्भेदी लैंगिक हल्ला आणि विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ला केला, असे अभियोग पक्ष शाबित करतो काय ?	नाही
४.	वर नमूद कालावधीत आणि ठिकाणी आरोपी क्र.२ ते ५ यांनी आरोपी क्र.१ कमल याचे लग्न पीडित बालिका हिचेसोबत लावून दिले, असे अभियोग पक्ष शाबित करतो काय ?	नाही

५.	आरोपींविरुद्ध दोषसिद्धी झाली काय ?	नाही
६.	कोणता आदेश ?	अंतीम आदेशाप्रमाणे

का र ण मि मां सा

वादबिंदु क्र. १ ते ५ बाबत

८. वर नमूद सर्व वादबिंदू हे परस्परावलंबी तसेच एकमेकांत गुंतलेले असल्याने पुराव्याचे रसग्रहण व विचारांचे प्रकटीकरण सुलभ होण्यासाठी तसेच चर्चेची पुनरुक्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे निर्णीत केलेले आहेत.

९. आरोपींविरुद्ध असलेल्या दोषारोप शाबितीसाठी अभियोग पक्षाने तोंडी तसेच लेखी पुरावा न्यायपटलावर सादर केलेला आहे. तशा शाबितीसाठी अभियोग पक्षाने केवळ तीन साक्षीदारांचा पुरावा न्यायपटलावर सादर केलेला आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार पीडित बालिकेवर लैंगिक अत्याचार झालेला आहे आणि त्या घटनांबाबत तिचा जबाब पोलिसांनी तसेच न्यायदंडाधिकारी यांनी नोंदवलेला आहे आणि त्यामुळे ती अभियोग पक्षाची अत्यंत महत्वाची आणि जिची साक्ष निर्णायक ठरु शकते अशी साक्षीदार आहे. त्यामुळे दोषारोप शाबितीसाठी न्यायालयात झालेला तिचा तोंडी पुरावा हा अत्यंत महत्वाचा असून खटल्याचे भवितव्य तिच्या पुराव्याचा दर्जा आणि सामर्थ्य यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

१०. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ म्हणजेच पीडित बालिका हिने तिच्या शपथेवरील पुराव्यात असे कथन केले की, ती व आरोपी कमल यांचा विवाह झाल्यानंतर ते दोघे त्याचे घरी एकत्र राहू लागले. यथावकाश ती गर्भवती झाल्याने बाळंतपणासाठी तिला आरोपी कमल आणि इतर कुटूंबियांनी रुग्णालयात दाखल केले, जेथे तिचा नि.क्र. ६२ चा जबाब नोंदविण्यांत आला. तिने पुढे असेही कथन केले की, तपासकामी न्यायदंडाधिकारी यांनी नि.क्र. ६३ चा तिचा जो जबाब नोंदविला आहे, त्यातील कथनांशी ती सहमत नाही. तिने पुढे असेही कथन केले की, दिनांक २०/०४/२००५ ही तिची वास्तव जन्मतारीख नाही. या व्यतिरिक्त तिने आरोपींना दोषारोपामध्ये गुंतवता येईल अशा प्रकारचे एकही मारक विधान केले नाही. सरतपासातच तिने असे कथन केले की,

तिची खरी जन्मतारीख २०.०४.२००५ अशी नसून २०.१०.२००२ अशी आहे, म्हणजेच फिर्याद दाखल तारखेस ती वयाने सज्ञान होती. त्याचप्रमाणे नि.क्र. ६२ ची फिर्याद आणि नि.क्र. ६३ च्या जबाबातील मजकुराशी ती सहमत नाही. थोडक्यात, सरतपासातच सदर साक्षीदाराने दोषारोपामधील अभियोग पक्षाच्या कथनास भगदाड पाडले. ती अल्पवयीन असून सुद्धा आरोपी कमल याने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि उर्वरीत आरोपींनी त्यांचा विवाह लावून दिला अशा स्वरुपाचे सुचक प्रश्न तिला वारंवार विचारुन सुद्धा तिने तशा प्रश्नांना स्पष्टपणे नाकारले आहे. न्यायदंडाधिकारी यांनी तिच्या नोंदवलेल्या नि.क्र.६३ च्या जबाबातील मजकुरास सुद्धा तिने सहमती दर्शविलेली नाही. तिची नेमकी आणि वास्तव जन्मतारीख किती आहे याचा तिने स्पष्ट उलगडा तिच्या पुराव्यात केलेला आहे. सदरच्या पुराव्यावरुन असे स्पष्ट होते की, पीडित बालिकेने दोषारोपासमर्थनार्थ कोणतेही विधान केलेले नाही अथवा कबुली दिलेली नाही. त्यामुळे असे स्पष्टपणे अनुमान काढता येईल की, सदरच्या आरोपामध्ये सत्यांश अथवा तथ्यांश यांचा अभाव आहे. थोडक्यात अशा सरतपासणी मधून आरोपींविरुद्ध दोषारोप शाबितीसाठी ठोसपणे कोणतेही महत्वाचे विधान अभियोग पक्षास न्यायपटलावर आणता आले नाही. यांस दुजोरा म्हणून की काय आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये तिने अभियोग पक्षाच्या विरुद्ध आणि बचाव पक्षाच्या हितामध्ये अत्यंत महत्वाच्या अशा पुढील कबुल्या दिलेल्या आहेत.

> *‘‘माझी वास्तव जन्मतारीख दिनांक २०/१०/२००२ अशी आहे, हे म्हणणे खरे आहे. ज्यावेळी माझे लग्न झाले, त्यावेळी मी एकोणीस वर्षाची होती, हे म्हणणे खरे आहे. माझे आई-वडील निरक्षर व अडाणी आहेत, हे म्हणणे खरे आहे. त्यामुळे माझी वास्तव जन्मतारीख माझे आई-वडिलांना माहीत नाही, हे म्हणणे खरे आहे. माझे शाळेच्या दाखल्यात नमूद जन्मतारीख ही अंदाजे नमूद केलेली आहे, हे म्हणणे खरे आहे. त्या दाखल्यात नमूद जन्मतारीख दिनांक २०/०४/२००५ ही चुकीची आहे, हे म्हणणे खरे आहे. ज्यावेळी मी दवाखान्यात दाखल होते, त्यावेळी माझी जन्मतारीख मला विचारली नव्हती, हे म्हणणे खरे आहे. चामोर्शी न्यायालातील जबाबाच्यावेळी सुद्धा मला माझे जन्मतारखेबाबत काहीही विचारले नव्हते, हे म्हणणे खरे आहे. त्या जबाबात माझी नमूद जन्मतारीख चुकीची आहे, हे म्हणणे खरे आहे. दोषारोपपत्रात नमूद केल्याप्रमाणे आरोपींनी गुन्हयाचे कोणतेही*

कृत्य कधीही केलेले नाही, हे म्हणणे आहे. आरोपीविरुद्ध माझी कधीही व कसलीही तक्रार नव्हती व आजही नाही, हे म्हणणे खरे आहे.''

११. वर नमूद कबुल्या या स्पष्ट व निर्णायक स्वरुपाच्या आहेत. त्या भांबावलेल्या विशिष्ट मन:स्थितीत अथवा गैरसमजुतीने दिल्या आहेत, असे अजिबात वाटत नाही. सदर कबुल्या या अभियोग पक्षाच्या दोषारोपपत्रातील कथनास अत्यंत मारक व नाशकारी अशा स्वरुपाच्या आहेत. पीडितेने तिच्या पुराव्यात तिची वास्तव जन्मतारीख सांगितली आहे. तसेच ती अल्पवयीन असताना आरोपी कमल याने तिचेसोबत शरीरसंबंध प्रस्थापित केलेले नाहीत, असे ती ठामपणे सांगते. त्यामुळे तिच्या वर नमूद पुराव्यावरुन असे निश्चितपणे अनुमान काढता येईल की, अभियोग पक्ष सांगत असलेल्या घटनेच्यावेळेस ती सज्ञान होती आणि ती सज्ञान असल्यामुळे ती स्वत:चे निर्णय स्वत: घेण्यास सक्षम होती. त्यामुळे दोषारोपपत्रात आरोपी कमल याचे विरुद्ध बलात्कार तसेच इतर आरोपींविरुध्द त्यांचा विवाह लावून दिल्याबाबत जे काही अभियोग पक्षाचे कथन आहे, त्या कथनास या महत्वाच्या साक्षीदाराकडून बळकटी मिळत नसल्यामुळे दोषारोप शाबितीसाठी सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास केवळ निरुपयोगी ठरतो.

१२. तपासकामाच्या दरम्यान प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी पीडितेचा जबाब फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये नोंदविलेला आहे, हे शाबित करण्यासाठी नि.क्र.६३ येथे तिचा जबाब दाखल केलेला आहे. सदरच्या जबाबातील मजकुरास पीडितेने सहमती दर्शविलेली नाही. अशा परिस्थितीत, जरी तो जबाब न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांनी नोंदविलेला असला तरी पण, तो निष्फळ व निष्प्रभावी ठरतो. त्यामुळे सुद्धा आरोपी कमल याने पीडित बालिकेवर लैंगिक अत्याचार केले आणि उर्वरीत आरोपींनी त्यांचा विवाह लावून दिला, या अभियोग पक्षाचा दोषारोप निष्फळ ठरतो. याबाबतीत आपण **कर्नाटक राज्य -वि- पी. रवीकुमार** या खटल्यातील न्यायनिर्णय जो **२०१९(३) महाराष्ट्र लॉ जर्नल (क्रि) पृष्ठ क्र. ३०९** येथे प्रकाशित झालेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेवू शकतो, ज्यामध्ये मा. सर्वोच्च

न्यायालयाने असे मत प्रकटन केलेले आहे की,

> *''न्यायदंडाधिकारी यांनी फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये नोंदविलेल्या जबाबाला ज्यावेळी अभियोग पक्षाचा साक्षीदार त्याच्या न्यायालयातील साक्षी पुराव्याच्यावेळी पुष्टी देत नाही अथवा सहमती दर्शवत नाही, त्यावेळी सदर जबाबाचे कोणतेही महत्व उरत नाही कारण असा जबाब हा सारात्मक अथवा मुख्य पुरावा या सदरात मोडत नाही.''*

१३. अशा परिस्थितीत, सदर जबाब सुद्धा निष्फळ ठरतो आणि आरोपींविरुद्ध असलेल्या दोषारोप सिद्धीसाठी त्याचा काहीच उपयोग होत नाही.

१४. याकामी दाखल असलेला इतर कागदोपत्री पुरावा म्हणजेच निशाणी क्र. ७६ ते ८० चे आरोपी अटकेचे पंचनामे, नि.क्र.७५ चा गुन्ह्याचा तपशिलाचा नमुना तसेच नि.क्र.७४ चा घटनास्थळाचा पंचनामा आणि तपासी अंमलदार यांनी केलेला पत्रव्यवहार तसेच नि. क्र.९७ येथील न्यायवैज्ञानिक परिक्षणाचा अहवाल, हे होय. सदरचे सर्व लेख पुराव्यामध्ये विचारात घेता येतील. सदर सर्व कागदपत्रांवरुन अधिकतर इतकेच अनुमान काढता येईल की, त्यामध्ये घटनास्थळावरील परिस्थिती आणि जप्त केलेल्या वस्तुंचा उल्लेख आहे. तसेच न्यायवैज्ञानिक परिक्षणाचा अहवाल आहे. सदर परिक्षण अहवालानुसार पीडित बालिका व आरोपी कमल हे दोघे बालक पार्थिक याचे जैविक पालक आहेत. या व्यतिरिक्त इतर कोणतेही अनुमान काढण्यासाठी सदर कागदपत्रांचा अभियोग पक्षास उपयोग होत नाही. ज्यावेळी अभियोग पक्षाचा अतिमहत्वाचा साक्षीदार दोषारोपसिद्धीसाठी अभियोग पक्षास दुजोरा देत नाही, त्यावेळी केवळ सदरच्या सर्व कागदपत्रांच्या आधारे आरोपींविरुद्ध कोणतेही ठोस अनुमान काढणे केवळ अशक्य आहे.

१५. घटनेचेवेळी पीडिता ही वयाने अज्ञान होती आणि दोषारोपपत्रात नमूद केलेप्रमाणे आरोपीने तिचेवर लैंगिक अत्याचार केले या कथनाच्या समर्थनार्थ अभियोग पक्षाने नि.क्र.६६ येथे वैद्य विस्मय देवतळे यांची साक्ष नोंदवलेली आहे. त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी असे ठळकपणे कथन केले की, त्यांनी वैद्यकीय अधिकारी या नात्याने पोलिसांच्या विनंतीवरुन पीडितेची वैद्यकीय तपासणी केली असता ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले आणि त्यांनी आवश्यक ते जनुकीय व जैवीक नमुने प्राप्त करुन ते

मोहरबंद अवस्थेत संबंधीतांकडे सुपुर्त केले. त्याचप्रमाणे आरोपीचे सुद्धा जनुकीय नमुने प्राप्त करुन ते मोहरबंद अवस्थेत संबंधीतांकडे सुपुर्त केले. सदर साक्षीदाराच्या उलटतपासाकडे नजर टाकली असता असे दिसून येईल की, आरोपीच्या हितामध्ये सदर वैद्यकीय अधिकारी यांनी कोणतीही महत्वाची कबुली दिलेली नाही. तरी सुद्धा दोषारोप सिद्धिसाठी सदर साक्षीदाराचा पुरावा सुद्धा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही, असे ठळकपणे दिसून येते. पीडितेची जन्मतारीख किती आहे आणि घटनेच्यावेळी खरोखरच ती वयाने अज्ञान होती अगर कसे, याबाबत सदर वैद्यकीय अधिकारी यांनी स्वतंत्र व सखोल पडताळणी केलेली दिसत नाही. पीडितेची जन्मतारीख निश्चित करण्यासाठी सदर साक्षीदाराकडून कोणत्याही कागदपत्राची छाननी झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे वैद्यकीय तपासणीचेवेळी पीडित बालिका ही वयाने अज्ञान होती की सज्ञान याची निश्चिती सदर साक्षीदाराकडून होत नाही. तथापि, पीडित बालिकेने ती फिर्याद देताना वयाने सज्ञानच होती असे ठामपणे सांगितले आहे. अशा परिस्थितीत, उलटतपासामध्ये जरी सदर साक्षीदाराचा पुरावा हा अखंडीत, अबाधित आणि अभेद्य राहिला असला तरी सुद्धा दोषारोप शाबितीसाठी सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

१६. दोषारोपाच्या शाबितीसाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.३ म्हणजेच अन्वेषण अधिकारी पल्लवी वाघ यांच्या पुराव्याचा आधार घेतलेला आहे. निशाणी क्र. ८१ येथे नोंदवलेल्या त्यांच्या पुराव्यात त्यांनी प्रामुख्याने असे कथन केले की, प्रस्तुत खटल्याचे तपासकाम त्यांनी पूर्ण केले आणि दोषारोपात नमूद केलेप्रमाणे आरोपींनी गुन्हा केल्याचे त्यांना निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. त्यांच्या तोंडी पुराव्याचा बारकाईने अभ्यास केला असता असे दिसून येते की, त्यांनी दोषारोपामधील अभियोगपक्षाच्या कथनास पूर्ण समर्थन केले आहे. तथापि, या न्यायालयाच्या तर्कसंगत बुद्धीस असे स्पष्टपणे जाणवते की, ज्यावेळी पीडित बालिकेचा पुरावा, जो अत्यंत महत्वाचा व निर्णायक स्वरुपाचा आहे तो, दोषारोप शाबितीसाठी अभियोग पक्षास निरुपयोगी ठरतो, त्यावेळी केवळ अन्वेषण अधिकारी यांच्या समर्थनिय तोंडी पुराव्याच्या आधारे आरोपींविरुद्ध दोषारोप सिद्धीचे अनुमान काढणेस अजिबात वाव नाही. कोणत्याही परिस्थितीत प्रस्तुत खटल्यामध्ये अन्वेषण

अधिकारी यांचा पुरावा हा पीडित बालिकेच्या पुराव्याला निष्क्रीय व निष्फळ करु शकत नाही. पीडित बालिकेचा पुरावा डावलून अन्वेषण अधिकारी यांच्या पुराव्याला प्राधान्य देता येणार नाही. त्यामुळे अन्वेषण अधिकारी यांचा तोंडी पुरावा सुद्धा प्रस्तुत खटल्याचे भवितव्य बदलू शकत नाही.

१७. आरोपींविरुद्धचा दोषारोप नि:संशयपणे शाबित करण्याची जबाबदारी पूर्णत: अभियोग पक्षाची आहे असे तत्व विशेषत: फौजदारी न्यायदान प्रक्रियेमध्ये स्थिरावलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी दाखल झालेल्या तोंडी व लेखी पुराव्याचा बारकाईने पडताळा घेतला असता असे दिसून येते की, तसा नि:संशय शाबितीचा पुरावा प्रस्तुत आरोपींविरुद्ध याकामी दाखल झालेला नाही. थोडक्यात आरोपींविरुद्धचे दोषारोप सिद्ध करण्यास अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. अशा परिस्थितीत, प्रस्तुत प्रकरणी सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. त्यामुळे वर नमूद विचार प्रकटनाच्या प्रकाशात सर्व वादबिंदूंचे निष्कर्ष त्या त्या प्रमाणे नोंदवून न्यायाचे कारणास्तव पुढीलप्रमाणे आदेश करणे न्यायोचित ठरेल, असे या न्यायालयाचे मत आहे.

<u>आदेश</u>

१) आरोपी क्र.१ **कमल पंचाराम साधु**, आरोपी क्र.२ **पंचाराम हरिबर साधु**, आरोपी क्र.३ **दिपुराणी उर्फ दिपु पंचाराम साधु**, आरोपी क्र.४ **निशा राजबिहारी सरकार** आणि आरोपी क्र.५ **राजबिहारी रविन सरकार** यांना भारतीय दंड संहिता १८६० कलम ३७६(२)(ज),(न) आणि ३७६(३) बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२, कलम ४ आणि ६ तसेच बाल विवाह प्रतिबंधक कायदा कलम ९, १० व ११ चे दोषारोपातून फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्त केले आहे.

२) सर्व आरोपींचे बंधपत्र आणि जामिनपत्र याद्वारे रद्द केले आहे.

३) वैद्यकीय अधिकारी यांनी घेतलेले सर्व जैविक व जनुकीय नमुने या सर्व वस्तु मुल्यहीन असल्याने आवाहन याचिकेचा कालावधी संपल्यानंतर संबंधीतांनी कायद्याप्रमाणे त्यांचा नाश करावा.

४) फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये प्रत्येक आरोपीने रक्कम रुपये १५०००/- चे बंधपत्र आणि जामिनपत्र या न्यायालयास सादर करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by UTTAM MURALIDHAR MUDHOLKAR
Date: 2023.04.26 11:05:33 +0530

(**उत्तम मु. मुधोळकर**)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
गडचिरोली

दिनांक : २५/०४/२०२३

Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

a) Name of the Stenographer	:-	Ramesh B. Chandekar Stenographer (Grade 1)
b) Court	:-	Additional Sessions Judge, Gadchiroli
c) Judgment dictated on	:-	25/04/2023
d) Judgment checked & signed by P.O.	:-	26/04/2023
e) Judgment uploaded on	:-	26/04/2023